**महाराष्ट्र शासन**

# उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा मुंबई विभाग मुंबई

प्रशासकीय अधिकारी प्रशिक्षण महाविद्यालय, खोली क्र.२१/२२, मानवी हक्क आयोगकार्यालयाशेजारी,
भरडा हायस्कूलसमोर, हजारीमलसोमानी मार्ग,बोरीबंदरमुंबई-४००००१
दूरध्वनी क्र.22073897 e mail-dydmumbai@rediffmail.com

क्र.उपसंक्री/युप्रशि/२०१८-१९/का-२ब/**१०४१** दिनांक:- **०४.०५.२०१८**

प्रती,

जिल्हा क्रीडा अधिकारी,
मुंबई शहर,मुंबई उपनगर,रायगड, ठाणे,पालघर.

विषय :- युवा प्रशिक्षणकेंद्राची स्थापना अंतर्गत
सन २०१७-१८ या वर्षात आयोजित करावयाच्या प्रशिक्षण शिबिराबाबत

संदर्भ :- संचालनालयाचे पत्र क्र. युकयो/युवाप्रशिक्षण/शिबिर/आयोजन/17-18/का-10
दि.08 डिसेंबर 2017

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येतेकी,समाजातील युवांची संख्या पाहतात्यांचेसाठी स्वतंत्र विचार करण्याची आवश्यकता आहे. वैश्विकरणाच्या युगात नवीन आव्हानांना तोंड देण्याकरिता युवांच्या समक्षीकरणाचीगरज आहे. युवा सक्षमीकरणहे घरांमधून, शाळा-महाविद्यालयांमधून, युवा मंडळांच्या माध्यमातून, शासकीय धोरणाचे माध्यमातून व समाजाचे माध्यमातून विविध उपक्रमांचे आयोजनातूनकरणा येणे शक्य आहे. या सर्व बाबीचा समावेश करुन महाराष्ट्र राज्याचे युवा धोरणांतर्गत शासननिर्णय क्र. युकयो/2012/प्र.क्र.63/क्रीयुसे-3 दि. 12 नोव्हेंबर, 2013 अन्वये युवा प्रशिक्षणकेंद्राची स्थापना या योजनेस मंजूरी प्रदानकरण्यात आली आहे.

**सन 2017-18 या वर्षामध्ये मुंबई विभागामार्फत आयोजित करावयाचे 10 दिवसाचे निवासी राज्य युवा प्रशिक्षण शिबिर न्यूझलँड होस्टेल, आरे वसाहत, गोरेगाव पूर्व, मुंबई येथे दि. 24 मे 2018 ते 02 जून 2018 या कालावधीमध्ये आयोजित करण्यात येत आहे. तरी सदर प्रशिक्षणासाठी प्रशिक्षणार्थीनी दि. 24 मे 2018 रोजी सकाळी 10 वाजता उपस्थित राहावे. सदर प्रशिक्षणार्थीची निवास व भोजन व्यवस्था या कार्यालयामार्फतकरण्यात येईल. तरी सदर शिबिरासाठी प्रत्येक जिल्हयातून 30 प्रशिक्षणार्थी ची नावे, पत्ता व संपर्क क्रमांका सह या कार्यालयास दि. 18 मे 2018 पर्यत कळविण्यात यावीत.**

सदर शिबिरासाठी नेहरू युवा केंद्र, राष्ट्रीय छात्रसेना, NSS,जिल्हयातील युवा संस्था, व शाळा-महाविद्यालये यांचेशी संपर्कसाधून अधिकाधिक प्रशिक्षण शिबिरार्थीची निवड करण्यात यावी.

तथापी आपल्या जिल्हयातील प्रशिक्षणार्थीसदर शिबिरास उपस्थित न राहिल्यास व शिबिरापासून वंचित राहील्यास सदरची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील याचीकृपया नोंद घेण्यात यावी.

सदर विषयी प्रथम प्राधान्याने कार्यवाही करण्यात यावी.

सदर शिबिरामध्ये देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणा चा तपशील सोबत जोडलेल्या परीशिष्टानुसार प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात येईल.

( एन. बी. मोटे )
उपसंचालक
क्रीडा व युवकसेवा मुंबई विभाग, मुंबई.

टिप:- न्यूझलँड वसतीगृह येथे जाणेसाठी गोरेगाव रेल्वे स्टेशन (पुर्व) येथून बस क्र. 342 न्यूझलँड वसतीगृह या स्टॉपवर उतरावे.